**श्री.दिलीप लहानु डोखे,तत्कालीन वरिष्ठ सहाय्यक (लेखा) व सेवानिवृत्त कनिष्ठ लेखाधिकारी यांनी कार्यालयीन कामी गैरवर्तन केलेने विभागीय चौकशी सुरु करणेकामी सादरकर्ता व चौकशी अधिकारी यांची नेमणुक करणेबाबत.**

अहिल्यानगर जिल्हा परिषद
अर्थ विभाग
आदेश क्रमांक अर्थ/कार्या-१/आस्था-१/४९२/२०२५
अहिल्यानगर दिनांक २८/०९/२०२५

वाचाः-१.मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद अहिल्यानगर यांचेकडील आदेश जा.क्र.कार्या-४/०२/३९/२०२२ दिनांक ०२/०२/२०२२
२.चौकशी समिती अहवाल दिनांक १७/०२/२०२२
३. इकडील ज्ञापन/दोषारोप पत्र क्रमांक अर्थ/कार्या-१/आस्था-१/३७७/२०२४ दिनांक १३/०१/२०२५
४. गट विकास अधिकारी, पंचायत समिती शेवगाव यांचेकडील ज्ञापन/दोषारोप दिनांक २१/०१/२०२५ रोजी बजावलेची सादर केलेली पोहच.
५. श्री.डी.एल.डोखे,से.नि.कनिष्ठ लेखाधिकारी यांनी सादर केलेला खुलासा दिनांक १२/०३/२०२५ इकडेस प्राप्त दिनांक २५/०३/२०२५
६. बालविकास प्रकल्प अधिकारी,ए.बा.वि.से.अकोले यांचेकडील अहवाल जा.क्र.लेखा/१३८/२०२५ दिनांक १२/०८/२०२५
७. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील ६ (३) व (५) नुसार

श्री.दिलीप लहानु डोखे, सेवानिवृत्त कनिष्ठ लेखाधिकारी,पंचायत समिती शेवगाव व तत्कालीन वरिष्ठ सहाय्यक (लेखा) ए.बा.वि.से.अकोले हे ए.बा.वि.से.राजूर येथे कार्यरत असताना ए.बा.वि.से.राजूर व अकोले येथे संशयीत अपहार प्रकरणी संदर्भ क्रमांक १ अन्वये चौकशी समिती नियुक्त करुन ए.बा.वि.से.प्रकल्प राजूर व अकोले येथील संपूर्ण आर्थिक व्यवहाराची सखोल चौकशी करण्याचे आदेश निर्गमित करण्यात आलेले होते. व त्याप्रमाणे संबधित गठीत समितीने प्रस्तुत चौकशी संदर्भ क्रमांक २ अन्वये कार्यालयास सादर केलेला आहे. त्याप्रमाणे श्री.डोखे, तत्कालीन वरिष्ठ सहाय्यक (लेखा) यांनी डॉ.ए.पी.जे.अब्दूल कलाम आहार योजनेअंतर्गत देयके दुबार प्रदान करणे, देयकांमध्ये अतिप्रदान करणे,योजनेचे व अन्य देयकांच्या रकमा स्वतःचे खात्यात जमा करणे,बँक यादीमध्ये खाडाखोड करणे,उपरीलेखन करणे इ.प्रकारचे आर्थिक गैरवर्तन केल्याचे निर्दशनास आलेले आहे.

त्याप्रमाणे संदर्भ क्र.३ अन्वयेचे ज्ञापन दोषारोप श्री.डोखे यांना संदर्भ क्र. ४ अन्वये बजाविण्यात आलेले आहे. सदर ज्ञापन दोषारोप पत्रामध्ये त्यांचेवर ठेवण्यात आलेले आरोपासंदर्भात श्री.डोखे यांनी संदर्भ क्रमांक ५ नुसार निवेदन दिलेले असुन त्याप्रमाणे श्री.डोखे यांनी प्रस्तुत दोषारोपा प्रमाणे आरोप अमान्य केलेचे दिसुन येत आहे.तसेच संदर्भ क्रमांक ६ अन्वये सदर दोषारोप पत्रावरील श्री.डोखे यांनी दिलेल्या बचावाचे निवेदनावरील अभिप्रायानुसार संबंधित कार्यालयाने त्यांचे बचावाचे निवेदनाशी असहमती दर्शविलेली आहे.

त्यानुसार श्री.डोखे,तत्कालीन वरिष्ठ सहाय्यक लेखा यांनी बचावाचे निवेदन सादर करताना दोषारोप पत्रामधील आरोप अमान्य केलेमुळे तसेच संबधित कार्यालयाने त्यांचे बचावाचे निवेदनाबाबत असहमती दर्शविलेने श्री.डी.एल.डोखे,तत्कालीन वरिष्ठ सहाय्यक (लेखा),ए.बा.वि.से.राजूर ता.अकोले व सेवानिवृत्त कनिष्ठ लेखाधिकारी,पंचायत समिती शेवगाव यांचेविरुध्द न्याय हक्काचे दृष्टीने विभागीय चौकशी करणे आवश्यक असलेने महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ६ (३) व (५) च्या तरतुदीनुसार खातेनिहाय विभागीय चौकशी करणेचे निश्चित करण्यात आलेले आहे.

..२

त्यासाठी सदरची चौकशी करणेकामी चौकशी अधिकारी, तथा सहाय्यक आयुक्त,विभागीय चौकशी (जि.प.कर्मचारी),आयुक्त कार्यालय,नाशिक विभाग, नाशिक यांची नियुक्ती करणेत येत आहे. विभागीय चौकशीस महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ च्या नियमातील तरतुदी लागु राहतील.

महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ चे नियम ६ (५) अन्वये जिल्हा परिषदेची बाजु मांडणेकरिता सादरकर्ता अधिकारी म्हणुन श्री. शिवराम धोंडू डगळे, कनिष्ठ प्रशासन अधिकारी, पं.स. अकोले यांची नेमणुक करण्यात येत आहे. सादरकर्ता अधिकारी यांनी प्रत्येक चौकशीचे तारखेस हजर रहावे.त्याप्रमाणे संदर्भ क्र.३ मध्ये नमुद केलेले आक्षेप व पुरावे यांचा सखोल अभ्यास करुन जिल्हा परिषदेची बाजु मांडावी. परिशिष्ट क्र.तीन व चार मध्ये (दोषारोपपत्र) नमुद केलेले साक्षीदार यांना पुराव्याच्या कागदपत्रांसह चौकशीच्या दिवशी हजर ठेवावे. तसेच सोबत आवश्यक कागदपत्रांचा तपशील जोडला आहे. उक्त नमुद कामी हयगय झाल्यास सादरकर्ता अधिकारी यांना जबाबदार धरण्यात येईल.

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक क्रमांक २०२५०९२८०५००५६ असा आहे.

Signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 28-09-2025 22:38:02
(आनंद भंडारी)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

**प्रति,**

१. प्रतः-विभागीय चौकशी अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,विभागीय चौकशी (जि.प. कर्मचारी), नाशिक विभाग,नाशिक.सोबत संबंधीत प्रकरणाचे आवश्यक कागदपत्र १ ते ९८.

२. श्री. शिवराम धोंडू डगळे, कनिष्ठ प्रशासन अधिकारी, पंचायत समिती अकोले

३. व्दारा व प्रत- गटविकास अधिकारी,पंचायत समिती अकोले
२/-सदर आदेशाची प्रत श्री. शिवराम धोंडू डगळे, कनिष्ठ प्रशासन अधिकारी, पं.स.अकोले यांना बजावुन दिनांकित स्वाक्षरीची प्रत या कार्यालयास सादर करावी.सोबत संबंधीत प्रकरणाचे आवश्यक कागदपत्र पान क्र.१ ते ९८.

४. श्री. दिलीप लहानु डोखे, तत्कालीन वरिष्ठ सहायक (लेखा), व सेवानिवृत्त कनिष्ठ लेखाधिकारी,पंचायत समिती शेवगाव
व्दारा :- गट विकास अधिकारी,पंचायत समिती शेवगाव
२/-सदर आदेशाची प्रत श्री.दिलीप लहानु डोखे,सेवानिवृत्त कनिष्ठ लेखाधिकारी यांना बजावुन दिनांकित स्वाक्षरीची प्रत या कार्यालयास सादर करावी.